# महात्मा जोतीबा फुले यांचे स्त्रीमुक्तीचे कार्य एक समाजशास्त्रीय अध्ययन

शोधपत्र-समाजशास्त्र

* कु. महानंदा राऊतखेडकर

सन १९७५ हे वर्ष संयुक्त राष्ट्रांनी 'जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केल्यावरच आधुनिक पाश्चात्य स्त्रीवादी विचार आणि चळवळींचा भारतातील स्त्रियांना परिचय झाला. आपल्याकडे तेव्हा स्त्री-वाद या शब्दाऐवजी 'स्त्री-मुक्ती चळवळ' असाच शब्द प्रचलित होता व आजही आहे. स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार करणारे महात्मा जोतीबा फुले स्त्री मुक्तीचे आद्य कैवारी समजले जातात. समाजजीवनात व कुटुंबात चोहोबाजूने बंदिस्त असलेल्या स्त्रीला मुक्त कसे करता येईल, या दृष्टीने म.फुलेंनी सतत कार्य केले. म्हणूनच आजही स्त्री मुक्ती चळवळीत 'करू पहिलं नमन जोतीबाला, ज्यांनी स्त्रीमुक्तीला जन्म दिला' असा म.फुलेंचा आदराने उल्लेख केला जातो, तसेच ८ मार्च हा दिवस आपण 'जागतिक महिला दिन' म्हणून साजरा करतो.

**कार्यक्षेत्र व संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन निबंधासाठी कोणत्याही शहराची, गावाची मर्यादा न ठेवता उपलब्ध झालेल्या दुय्यम तथ्य सामुग्रीद्वारा महात्मा जोतीबा फुलेंचे स्वतःचे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, लिखाण तसेच त्यांच्यावर लिहिलेले इतर तज्ज्ञांचे, विचारवंतांचे लिखाण हे कार्यक्षेत्र निश्चित केले गेले आहे. या दुय्यम तथ्य सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी 'महात्मा फुले समग्र वाङ्मय', 'महात्मा फुले गौरवग्रंथ', 'दै.पत्रिका', 'अनेक मुळ ग्रंथ', 'स्त्री विशेषांक', 'स्त्रीसंबंधी पत्रिका', 'वैचारिक लेख', 'शोधनिबंध' आणि 'विविध मासिके' या सर्वांचा आधार घेण्यात आला आहे.

**संशोधन आराखडा :-**

**वर्णनात्मक संशोधन आराखडा :-** एखाद्या समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करणे हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश असतो. तसेच वर्णनात्मक संशोधन आराखड्यामध्ये समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमी विचारात घेऊन केवळ वर्णन केले जाते. प्रस्तुत संशोधन निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची व्याप्ती व मर्यादा :-** महात्मा जोतीबा फुले विषयक साहित्य भारतातच नव्हे, तर जगभरात प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपात, विविध भाषेत विखुरलेले आहे. त्यात त्यांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय व इतर अनेक पैलूंविषयी विचार व्यक्त होतात. परंतु, प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या केवळ स्त्रीमुक्तीच्या, स्त्री उद्धाराच्या कार्याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. अतिशय स्पष्ट शब्दात सांगावयाचे झाल्यास विचारात घेतलेले क्षेत्र हे अतिशय मर्यादित अशा स्वरूपाचे आहे.

**उद्देश :-** १) महात्मा जोतीबा फुले स्त्री मुक्ती चळवळीचे उद्गाते आहेत याचे अध्ययन करणे. २) महात्मा जोतीबा फुले यांच्या स्त्रीमुक्तीच्या कार्याचे विश्लेषण करणे. ३) महात्मा जोतीबा फुले यांच्या स्त्री मुक्तीच्या कार्यामुळे स्त्रियांची विविध अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, निर्बंध यातून मुक्तता झाली याचे अध्ययन करणे.

**प्रस्तावना :-** भारतात प्राचीन काळापासून स्त्रियांच्या एकूणच परिस्थितीचा विचार केला तर स्त्रियांची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती अत्यंत दयनिय स्वरूपाची होती. महात्मा जोतीबा फुलेंच्या काळातही स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्या, स्त्रियांना गुलामीत ठेवणाऱ्या एवढ्याच नव्हे तर माणूस म्हणून त्यांचा जगण्याचाही अधिकार नाकारणाऱ्या रूढी-प्रथा, परंपरा, समाजात अस्तित्वात होत्या. त्यात कन्याहत्या, सतीप्रथा, बालविवाह, बहुपत्नीत्वाची प्रथा, विधवा पुनर्विवाह बंदी, केशवपन, स्त्रीशिक्षणावर बंदी, बाला-जरठ विवाह इत्यादी स्त्रियांना दुय्यमत्त्वाचा दर्जा प्रदान करणाऱ्या प्रथा समाजात ठाण मांडून बसल्या होत्या. या सर्व प्रथांना महात्मा जोतीबा फुलेंनी आपल्या साहित्यातून कठोर शब्दात विरोध तर केलाच पण त्या बंद करण्यासाठी प्रत्यक्ष स्त्री उद्धाराचे कार्य देखील केले. जोतीरावांच्या पूर्वीही राजाराम मोहन रॉय, केशवचंद्र सेन, देवेंद्रनाथ टागोर, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद यांनी सामाजिक सुधारणा चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. महात्मा फुले यांचे स्त्रियांना मुक्ती देणे, स्वातंत्र्य देणे, मानव म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून देणे, हे त्यांच्या स्त्री-उद्धाराच्या कार्याचे उद्दिष्ट होते. हे पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**मुलींच्या शाळांची स्थापना :-** महात्मा जोतीबा फुलेंच्या काळात स्त्री शिक्षणविषयक परिस्थिती अनुकूल नसल्या कारणाने सर्वच स्तरातील स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. तेव्हा "हिंदू धर्माने ज्यांना शतकानुशतके शिक्षणापासून वंचित ठेवले होते अशा शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी जोतीबा फुले यांनी १८४८ मध्ये ऑगस्ट महिन्यात पुणे येथील बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात शाळा सुरू केली होती"[१]. ही भारतीय व्यक्तिने भारतातील बहुजन समाजातील मुलींसाठी काढलेली पहिली शाळा होती. फुले ही शाळा स्वतःच्या खर्चाने चालवित

* संशोधक विद्यार्थीनी, समाजशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (महाराष्ट्र)

असत. त्या शाळेत शिकवणाऱ्या सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत. या ज्ञानदानाच्या पवित्र कार्यात त्यांचा सनातन्यांनी अनंत छळ केला. परंतु, अत्यंत जिद्दीने त्यांनी शेवटपर्यंत महात्मा जोतीबा फुले यांच्या शैक्षणिक कार्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली.

**केशवपनाविरुद्ध न्हाव्यांचा संप :-** महात्मा जोतीबा फुले हे एक थोर समाजसुधारक होते. म्हणूनच सामाजिक सुधारणेचा एक भाग म्हणून बुद्धीला, माणुसकीला न पटणाऱ्या व स्त्रियांच्या जीवनाचा छळ करणाऱ्या घातक रूढी, प्रथा व परंपराचा त्यांनी प्रखर विरोध केला. याच सर्व प्रथांपैकी एक प्रथा म्हणजे 'केशवपनाची' होय. महात्मा फुलेंनी केवळ केशवपनाची प्रथा बंद करण्याकरिता १४ एप्रिल १८९० रोजी मुंबई येथे नाभिक समाजाच्या एका मोठ्या सभेचे आयोजन केले होते. त्यावेळी विधवांच्या केशवपनासारखी चाल बंद करण्यासंदर्भातील जाहिराती जागोजागी लावण्यात आलेल्या होत्या. स्त्रियांचे सौंदर्य अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांचा मौल्यवान दागिना म्हणजेच त्यांचे केश, निरपराधी विधवांकडून तो अत्यंत क्रूरपणे हिसकावून घेणे अन्यायकारक आपल्या धंद्यास बरकत न देणारा आहे असे सांगून यापुढे कोणीही नव्या विधवेचे केशवपन करू नये' असा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. मुंबईच्या एलफिन्स्टन शाळेच्या मागील मैदानावर ही ऐतिहासिक सभा आयोजित केली होती. या सभेसाठी संबंध महाराष्ट्रातून सुमारे १५०० च्यावर न्हावी हजर होते[२].या चळवळीमुळे म.फुलेंच्या काळात एका नव्या पर्वाला आरंभ झाला. असेच म्हणावे लागेल. तसेच महात्मा फुले यांनी स्त्री अन्यायाविरूद्ध जी जागृती केली त्याचाच परिणाम म्हणजे न्हाव्यांनी केशवपनावर टाकलेला बहिष्कार होय.

**विधवा पुनर्विवाहास प्रारंभ :-** महात्मा फुलेंच्या काळात, विधवा स्त्रियांना पुर्नविवाहाचा अधिकार नव्हता. विधवा स्त्रियांवर तत्कालीन समाजात अनेक बंधने होती. त्यांचा अनेक रूढी-प्रथा-परंपरांच्या नावाखाली छळ केला जाई. अशा प्रतिकूल परिस्थितीतून विधवा स्त्रियांची सुटका होण्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी -'स्त्री पुर्नविवाहाची बंदी | अन्यायाची धुंदी || थांग नाही'[३]. अशा शब्दात या प्रथेचा विरोध केला आहे. विधवा पुनर्विवाह बंदी हा हिंदू धर्मास लागलेला एक मोठा कलंक आहे असे ते नेहमी म्हणत असत. स्त्री जातीवरील हा अन्याय दूर व्हावा म्हणून समाजात पुर्नविवाहाची चाल रूढ झाली पाहिजे म्हणून त्यांनी प्रयत्न केला. जोतीरावांच्या प्रोत्साहनामुळे एक विधवा पुर्नविवाह घडून आला. याची बातमी ज्ञानप्रकाशने १२ मार्च १८६६ रोजी छापली होती ती पुढीलप्रमाणे:- "शेणवी समाजातील एका विधवेचा शेणवी विधुराचेबरोबर ८ मार्च १८६० रोजी पुण्यात पुनर्विवाह झाला. ती विधवा अकरा वर्षाची होती, ही बातमी प्रसिद्ध करून ज्ञानप्रकाशने असे म्हटले की, आम्ही याच्यावर मत देण्याची आवश्यकता नाही."

**बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना १८६८ :-**महात्मा जोतीराव फुले यांच्या काळात शूद्रातिशूद्र स्त्रियांप्रमाणेच उच्च वर्णीय स्त्रियांवरदेखील अनेक प्रकारची बंधने होती. विधवा स्त्रियांना पुर्नविवाहाची बंदी होती. अशा शेकडो तरूण विधवांचे आडमार्गाने पाऊल पडून त्या गरोदर होत असत आणि तसेच झाले म्हणजे त्या व त्यांचे आप्त लोक जननिंदेच्या भीतीने गर्भ नाश करत असत आणि तसे न झाल्या बाळंत झाल्यावर जन्मलेल्या अर्भकाला मारून रात्री-बेरात्री गल्लीत बोळात फेकत असत. अशा विधवांची दु:खातून सुटका करण्यासाठी १८६८ मध्ये पुण्यात जुन्या गंजपेठेतील स्वत:च्या घरातच त्यांनी, 'बालहत्या प्रतिबंधक गृह' काढले. विधवा बायकांनी गुप्तपणे बाळंत होऊन तेथे मूल ठेऊन जावे अशी सोय केली होती. अशा मुलांचा सांभाळ सावित्रीबाई करणार होत्या. या बालहत्या प्रतिबंधक गृहाची माहिती देणारी भितीपत्रके पुणे शहरात घराघरावर लावण्यात आली. "विधवांना इथे येऊन गुप्तपणे सुरक्षितपणे बाळंत व्हा, तुम्ही आपले मूल न्यावे किंवा इथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील. त्या मुलांची काळजी हा अनाथाश्रम घेईल"[४] शीबाईच्या १८६३ च्या खटल्यामुळे महात्मा जोतीबा फुलेंच्या विचारांना कृतीची जोड प्राप्त झाली. वास्तविक पाहता, तत्कालीन परिस्थितीत महात्मा फुलेंचीच आर्थिक परिस्थिती बिकट अशा स्वरूपाची होती. तरी देखील त्यांनी पुणे येथे अशा विधवांसाठी आश्रम सुरू केला. "त्यांनी शहरभर आणि इतर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जाहिराती लावल्या, काळेपाणी टाळण्याचा उपाय" आणि असा आश्रम सुरू केल्याची माहिती सर्वत्र पोहोचवली. अनेक ठिकाणाहून ३५ ब्राह्मण विधवा १८८४ पर्यत त्यांच्याकडे आल्या. त्यांची बाळंतपणे स्वत: सावित्रीबाईंनी केली. १८७४ साली अशीच एक दुसरी काशीबाई त्यांच्याकडे आली होती. तिचा मुलगा त्यांनी दत्तक घेतला[५]

**बाला-जरठ विवाहास विरोध :-**महात्मा जोतीबा फुलेंच्या काळात समाजात स्त्रीविषयक विविध अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांचा समाजावर पगडा होता. त्याचाच एक भाग म्हणजे समाजात प्रचलित असणारी बाला-जरठ विवाहाची प्रथा किंवा पद्धत होय. या प्रकारच्या विवाहात मोठ्या वयाच्या पुरषांचा विवाह लहान वयाच्या मुलीशी लावला जात होता. बाला-जरठ विवाहाचा विरोध सर्वच समाजसुधारकांनी अगदी तळमळीने केलेला दिसतो. महात्मा जोतीबा फुलेंनीदेखील त्या अनिष्ट, जाचक प्रथेचा अत्यंत कडक शब्दात आपल्या लिखाणात विरोध केलेला दिसतो तो पुढीलप्रमाणे, "साठसत्तर वर्षाच्या जर्जर झालेल्या बोचऱ्या, खल्लड जरठाशी आर्य भट्टांनी पूर्वी लग्न लाविलेल्या स्त्रिया मरताच त्यांना लावण्यवती अशा अज्ञानी मुलींबरोबर पुन:संबंध करून, त्या अबलांच्या तारुण्यात माती कालवतात."[६] बाल-जरठ विवाहामुळे लहानपणीच कोवळया वयात मुलींवर वैधव्याची पाळी येते आणि या अकाली वैधव्यावरच केशवपन, अन्य पुरुषांच्या वासनेला बळी पडणे, कौटुंबिक सुखाला वंचित होणे, आप्त-स्वकीयांवर ओझे बनून आयुष्य काढण्यासारखे संकटे कोमल वयातच मुलींना वाट्याला येतात. मानसिक कुचंबणा तर होतेच पण एकाचवेळी मुलींना अनेकविध संकटांना सामोरे जाताना होणारा त्रास असहनीय असतो. या सर्व गोष्टींची जाणीव महात्मा फुलेंना एक समाजचिंतक, सामाजिक विचारवंत म्हणून होतीच. त्यामुळे त्यांनी बाल-जरठ विवाहाला विरोध

करण्याचे महत्त्वाचे कार्य केले.

**सतीप्रथेला विरोध-** म. जोतीबा फुलेच्या काळात सती जाण्याची देखील प्रथा होती. "पतीच्या मृत्युनंतर पत्नीने चितेवर जाळून घेवून मरण पत्कारणे म्हणजे सती जाणे होय." पारंपारिक धर्मग्रंथानी, सनातनी लोकांनी स्त्रियांवर अनेक प्रथा, परंपरा लादल्या होत्या. ज्याचा एकमेव उद्देश म्हणजे स्त्रियांना गुलामीत ठेवतो, पुरुषप्रधान संस्कृतीत त्यांना कायमचा दुय्यम दर्जा प्रदान करणे. अशाच प्रथांचा एक भाग म्हणजे सतीप्रथा होय, या क्रूर, अमानुष प्रथेचा विरोध करतांना म. फुले म्हणतात "एखाद्या स्त्रीचा नवरा ज्यावेळेस मृत होतो त्यावेळेस तिला फार दुःख सागरात बुडून तिला फार संकटे सोसावी लागतात. मरेपर्यंत सारा काळ वैधव्यांत काढावा लागतो, इतकेच नव्हे तर पूर्वी कित्येक सतीदेखील जात असत, परंतु पुरुषाला तिच्याविषयी दुःख होऊन तो कधी 'सता' गेलेला ऐकिला आहे काय?"[७] म. फुले स्त्री व पुरुषांना समान मानतात. स्त्रियांना जे नियम समाजात लागू असतात तेच नियम पुरुषांना का नाही लागू होत असा प्रश्न म. फुले वरील विधानातून विचारतात. जिथे-जिथे स्त्रियांवर अन्याय-अत्याचार होतो तिच्यावर स्त्री म्हणून अनिष्ठ प्रथा लादल्या जातात तिथे-तिथे म. फुले स्त्रियांची बाजू घेवून परंपरागत समाजाच्या विरोधात जातात.

**बहुपत्नीकत्वाचा विरोध-**म. जोतीबा फुले यांनी स्त्रियांवर अन्याय अत्याचार करणाऱ्या सर्व प्रथांचा विरोध केलेला दिसतो यामागे त्यांचा मानवतावादी दृष्टकोन होता. म्हणूनच समाजात मोठ्या प्रमाणात प्रचलीत असणाऱ्या बहुपत्नीत्वाच्या प्रथेचा म. फुलेनी विरोध केला आहे. कारण अशा प्रकारच्या विवाहामागे पुरुषांची स्त्री उपभोगाची प्रवृत्ती असून स्त्रीला पुरुषाची कामवासना पूर्ण करण्याचे साधन मानणारी सामाजिक मानसिक प्रवृत्ती दिसते. याचा विरोध करताना म. फुले म्हणतात, "घरात स्त्रिया अनेक सवता करून नांदतात काय? घरामध्ये महापतिव्रता स्त्री असता अत्यंत लोभी पुरुष तिच्या उरावर दुसऱ्या लग्नाच्या दोन-दोन, तीन-तीन बायका करतात, त्याचप्रमाणे एकंदर सर्व स्त्रिया एका पुरुषाबरोबर लग्न लावल्यानंतर त्याच्या घरी नांदत असता दुसऱ्या एखाद्या गृहस्थाबरोबर लग्न लावून त्याचेच घरी आपल्या पतीचा 'सवता' करून नांदतात काय?"[८] म. फुल्यांचा हा प्रश्न पुरुषांना अंतर्मूख करतो. स्त्री-पुरुष जेव्हा सर्व धार्मिक विधी, संस्कारासोबत विवाहबद्ध होतात तेव्हा जसा पुरुषाचा स्त्रीवर अधिकार असतो तसाच स्त्रीचाही पुरुषावर अधिकार असतो आणि या अधिकारात जर दुसरी एखादी स्त्री सहभागी होत असेल तर ते जगातील सर्वात मोठे दुःख त्या स्त्रीच्या दृष्टीने असते. हे कटू सत्य म. फुले सर्व पुरुषांच्या परंपराधिष्टित समाजाच्या दृष्टीस आणुन देण्याचा प्रयत्न करतात.

**देवदासी प्रथेला विरोध-** सौदंती येथे यलम्मा नावाची देवी आहे तिला नवस केला जातो. पहिली मुलगी या देवीला वाहावी लागते. यामुळे असंख्य मुलींना या देवीच्या सेवेत राहावे लागते. सोलापूर, सांगली, निपाणी आणि कोल्हापूर या भागात या देवीचे मोठे प्रस्थ आहे. म.फुले यांच्या काळात देवदासीची प्रथा देखील अस्तित्वात होती. एके दिवशी मुंबईत आनंदराव तालचेरकर, नारायणराव लोखंडे, जोतीबा फुले आणि जोतीबांचे मुंबईचे एक मित्र यशवंतराव मणेरीकर तिसऱ्या प्रहरी घोडागाडीतून मार्केटकडे निघाले होते. एवढ्यात एक देवदासीच्या लग्नाची मिरवणूक त्या रस्त्याने निघाली होती. त्या देवदासीच्या आईने प्रथेप्रमाणे पुरोहिताच्या सल्ल्याप्रमाणे स्वर्गसुखाच्या काल्पनिक आशेने आपल्या मुलीचे लग्न खंजीराबरोबर लावून तिला (देवीच्या) शेजीला वाहण्याचे ठरविले होते[९] म. फुलेंना हा प्रकार कळताच त्यांनी मणेरीकरांच्या मदतीने त्यावेळच्या पोलिस सुपरिंटेंडेटची भेट घेतली व त्यांना हा प्रकार समजावून सांगितला. परंतु त्या युरोपीयन अधिकाऱ्याची त्या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची हिम्मत होईना कारण धार्मिक क्षेत्रात ढवळाढवळ न करण्याचे त्यांचे धोरण होते. म. फुलेंनी हा प्रकार कमिशनर सावटन यांची भेट घेऊन त्यांनाही समजावून सांगितला त्यांनी मात्र त्या दिवशी तो लग्नविधी होऊ दिला नाही.[१०] परंतु नंतर या प्रकरणामुळे सर्व मुंबईत वादळ उठले वर्तमानपत्राचे रकाने भरू लागले व तो विधी शेवटी पार पडला. परंतु म. फुले इथेच थांबले नाहीत. लग्नविधी झाले हे कळाल्यावर त्यांना फार वाईट वाटले. म्हणूनच त्यांनी या प्रथेवर सरकारने कायद्याने बंदी घालावी व लोकांनी आपल्या प्रयत्नाने ती मोडावी अशी दीनबंधूमधून फार मोठी लेखमाला लिहिली आणि तसा सरकारकडेही अर्ज केला[११] .

**बालविवाहाला विरोध-** म. फुले यांनी अशाप्रकारच्या बालविवाहाच्या प्रथेलाही, विरोध केला. बालपणीच मुलींचे विवाह लावून कौटुंबिक जबाबदाऱ्या त्यांच्यावर लादण्यास, बालवयातील विवाहामुळे त्यांना पुढील आयुष्यात अनेक संकटांना सामोरे जावे लागते. यामुळे म. फुले म्हणतात, "अज्ञानी शेतकऱ्यात लहानपणीच लग्न करण्याची वहिवाट असल्याने प्रथम एकंदर शेतकऱ्यांच्या कोवळ्या जिवांचा भंग होते." बालविवाहाच्या प्रथेमुळे मुर्लींचा शारीरिक, मानसिक विकास तर खुंटतोच परंतु ८-१० वर्षाला लग्न झाल्यामुळे चौदाव्या - पंधराव्या वर्षी मुली आई होत होत्या. स्वतःचे बालपण संपण्याआधीच त्यांच्या पदरात त्यांचे बाळ येत असे. कौटुंबिक जबाबदाऱ्या, मुलांचा सांभाळ, विविध अनिष्ट प्रथा परंपरांचे ओझे, स्त्री म्हणून कुटुंबात दुय्यम दर्जा या सर्वामुळे स्त्रियांना ह्या हालअपेष्ठा सोसाव्या लागत असत. म्हणूनच म. फुलेंनी बालविवाहाच्या प्रथेला विरोध केलेला दिसतो.

**सत्यशोधक समाज पुरस्कृत विवाह पध्दत:-** म. जोतीबा फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाने पुरोहित नाकारून साध्या पद्धतीने हुंड्याशिवाय कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह २५ डिसेंबर १८७३ मध्ये लावण्यात आला. सावित्रीबाईंची मैत्रिण वजूबाई ग्यानोबा निबांणकर यांची कन्या राधा आणि कार्यकर्ते सीताराम आल्हाट यांचा हा विवाह होता. म. फुलेंनी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी म्हणजे १६ व्या वर्षी आपल्या दत्तक पुत्राचा विवाह याच पद्धतीने केला. हा भारतातला आधुनिक काळातला पहिला आंतरजातीय विवाह होता. म. फुलेंनी परंपरागत विवाहपद्धतीत आमूलाग्र बदल करण्यासाठी सत्यशोधक

समाजाच्या विवाह सोहळ्यातील मंगलअष्टकांची रचना केली. ह्या मंगलाष्टकात पितृसत्ताकपद्धतीच्या विरोधात आवाज उठविलेला दिसतो. स्त्री गुलामगिरीच्या समाप्तीची सुरुवात ही मंगलाष्टके करतात. जोतीरावांनी विवाह म्हणजे लग्नाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला आहे. "हर एक मानव पुरुष व स्त्री हे उभयतां मरेतों-पावेतो एकमेकांचे साथी व सहाय्यकारी होऊन एकचित्ताने वर्तन करून त्यांनी सुखी व्हावें, म्हणून जी काही परस्परांशी कबुलायत करण्याची वहिवाट घातली आहे, त्यास लग्न म्हणतात"[१२]

**निष्कर्ष :-** १ म. जोतिबा फुलेंच्या काळात भारतीय समाजातील बहुसंख्य स्त्री, शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारण्यात आला होता अशा प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरोधात जाऊन म. जोतिबा फुले यांनी स्त्रियांची अज्ञान, निरक्षरता, गुलामगिरी यातून सुटका करण्यासाठी १८४८ मध्ये पुणे येथे शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू केली. तसेच अज्ञानी, अंधश्रद्धा स्त्रियांचे आर्थिक शोषण थांबवण्यासाठी प्रौढ शिक्षणाच्या शाळेची स्थापना केली. म. फुलेंचे हे कार्य म्हणजे स्त्रीला दास्यत्त्वातून मुक्त करण्याचे पहिले पाऊल होते. २. म. जोतीबा फुले यांच्या बालविवाहास विरोध या कार्यामुळेच स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक विकास शक्य झाला. तसेच बालपणी /लहान, वयात येणाऱ्या कौटुंबिक जबाबदारीतून तसेच अकाली येणाऱ्या वैधव्यातून स्त्रियांची मुक्ती झाली. ३. म. जोतिबा फुले यांनी स्त्री व पुरुष मानव म्हणून समान असतील तर पतीच्या मृत्युनंतर स्त्रियाच सती जातात, पुरुष सता गेलेला पाहिला का? असा प्रश्न विचारून स्त्रियांच्या जीवन जगण्याच्या मूलभूत अधिकाराचा विचार करतात. स्त्री व पुरुष यांच्यासाठी वेगळे नियम लावणाऱ्या पुरुषप्रधान व्यवस्थेचा विरोध करतात. ४. तत्कालीन समाजात अस्तित्वात असलेली बहुपत्नीत्वाची प्रथा म्हणजे स्त्रीउपभोगाची सामाजिक मान्यता असणारी व्यवस्था होती तर देवदासी प्रथा म्हणजे स्त्रीउपभोगासाठी मिळालेली धार्मिक मान्यता होती. स्त्रियांच्या आत्मसन्मानाला व चारित्र्याला, अस्मितेला कलंकीत करणाऱ्या दोन्ही प्रथांना म. फुलेंनी विरोध केला. त्यामुळेच बहुपत्नीत्वाची व देवदासी प्रथा कायद्याने बंद होऊन स्त्रियांचा सामाजिक दर्जा सुधारण्यास मदत झाली. ५. मु. फुलेंनी तत्कालीन समाजात अस्तित्वात असणाऱ्या विधवा स्त्रियांच्या म्हणजे स्त्रियांचे सौंदर्य विकृत करणाऱ्या प्रथेच्या विरोधात न्हाव्याचा संप घडवून आणला. तसेच विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाचा अधिकार नाकारण्यात आला होता. तेव्हा म. फुलेंनी शेणवी जातीत विधवा पुनर्विवाह घडवून आणून स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ६. विधवा गर्भवती स्त्रियांना कुटुंब, आप्त, समाज व धर्माच्या भीतीने आत्महत्या कराव्या लागत किंवा गर्भाला नष्ट करावे लागत. अशा स्त्रियांना मातृत्वाचा अधिकार व अर्भकाला या जगात येण्याचा, जगण्याचा अधिकर म. फुलेंनी स्थापन केलेल्या बालहत्याप्रतिबंधक गृहामुळे प्राप्त झाला, यासाठी त्यांना खूप विरोध सहन करावा लागला. यावरून म. फुले हे बोलघेवडे समाजसुधारक नव्हते तर कृतीशील सामाजिक विचारवंत होते हे सिद्ध होते. ७ म. फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून या समाजाच्या लग्नविधीत नवीन मंगलाष्टकांची रचना करून, स्त्रियांना समानता, स्वातंत्र्य, अधिकार देणारी मंगलाष्टके त्यांनी वधु-वराच्या मुखातून वदवून घेतली. सारांश, वरीलप्रमाणे म. जोतीबा फुले यांनी मुलींच्या शाळांची स्थापना, बालविवाहास , बहुपत्नीत्वाच्या प्रथेला, बाल-जरठ विवाहास विरोध, केशवपन, देवदासी, सती प्रथा आदींना विरोध केला तसेच बालहत्याप्रतिबंधक गृहाची स्थापना, सत्यशोधक समाजाची स्थापना, प्रौढ शिक्षणाच्या शाळेची सुरुवात केली. हे सर्व कार्य स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. म. फुलेच्या कार्यामुळेच समाजाचा अर्धा हिस्सा असणाऱ्या स्त्रिया आज सन्मानाने जगून एकूणच समाज व देशाच्या विकासास मदत करत आहेत.

## सन्दर्भ ग्रन्थ

१. आगलावे सरोज, २००८, 'जोतीराव फुले : सामाजिक तत्त्वज्ञान', पुणे, सुगावा प्रकाशन, १ ली आवृत्ती, प्र.क्र. १३५, १३६ २. पवार ग.बा. १९९१, 'युगपुरुष : महात्मा जोतीराव फुले', पुणे, वंदे मातरम् भारतीनगर, पोंडमार्ग, पृ.क्रं.१५२, १५३. ३. धनंजय कीर, स.ग.मालशे, य.दि.फडके (संपा) महात्मा फुले समग्र वाङ्मय, अखंडादी काव्यरचना, पृ.क्रं.५७२, २००६, आ.६ वी ४. कीर धनंजय, महात्मा फुले चरित्र, पाल्युलर प्रकाशन, मुंबई, १९७३, पृ.क्रं.३०. ५. नरके हरी (संपा), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा' ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, २००६, ५ वी आवृत्ती, मुंबई प्रधान सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पृष्ट क्रं.३० ६. धनंजय कीर, स.गं.मालशे, य.दि.फडके (संपा), "महात्मा फुले समग्र वाङ्मयः, ६ वी आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई २००६, पृ.क्रं. ४६८. ७. धनंजय कीर, स. ग. मालशे, य. दि. फडके (संपा) म. फुले समग्र वाङमय, सार्वजनिक सत्यधर्म २००६, ६ वी आवृत्ती, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ पृ. क्र.४६६ ८. धनंजय कीर, स. ग. मालशे, य. दि. फडके (संपा) म. फुले समग्र वाङमय, सार्वजनिक सत्यधर्म २००६, ६ वी आवृत्ती, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ. ९. नरके हरी, आम्ही पाहिलेले पुणे, १९९३, आवृत्ती, महाराष्ट्र शासनव्दारा उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई, पृ. क्र. ४५. १०. तत्रैव पृ. क्र. ९६ ११. तत्रैव पृ.क्र. ४७ १२. धनंजय कीर, स.ग. मालशे, य. दि. फडके (संपा), महात्मा फुले समग्र वाङ्मय सार्वजनिक सत्यधर्म, पृ. क्र. ५३९. १३. भांडारकर पु.ल., १८८७, 'सामाजिक संशोधन पद्धती,', तिसरी आवृत्ती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर. १४. डॉ.बोधनकर सुधीर, प्रा.विवेक अलोणी, जाने. २००७, 'सामाजिक संशोधन पद्धती', चतुर्थ आवृत्ती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.